प्रेसनोट दि. २९.०९.२०२१

**ग्रामपंचायत कार्यालय, टाकवे, ता.शिराळा, जि.सांगली येथील ग्रामसेवक, श्री.विकास आनंदराव वनारे यांना २००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

---

तक्रारदार यांच्या नोंद केलेल्या घराचा ८अ चा उतारा देण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय, टाकवे, ता.शिराळा, जि.सांगली येथील ग्रामसेवक, श्री.विकास आनंदराव वनारे यांनी तक्रारदार यांचेकडे लाच मागणी केल्याबाबतची तक्रार दिनांक २९.०९.२०२१ रोजी नोंदविली.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक २९.०९.२०२१ रोजी केले पडताळणीमध्ये ग्रामपंचायत कार्यालय, टाकवे, ता.शिराळा, जि.सांगली येथील ग्रामसेवक, श्री.विकास आनंदराव वनारे वय ४१ वर्षे यांनी तक्रारदार यांच्याकडे नोंद केलेल्या घराचा ८अ चा उतारा देण्यासाठी २००/- रुपयांची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.२९.०९.२०२१ रोजी ग्रामपंचायत कार्यालय, टाकवे येथे सापळा लावला असता त्यावेळी लोकसेवक वनारे यांनी तक्रारदार यांना ८अ चा उतारा देण्यासाठी २००/- रूपये दे असे म्हणून लाचेची मागणी करून २००/- लाच रक्कम ग्रामपंचायत कार्यालय, टाकवे, ता.शिराळा, जि.सांगली येथे स्विकारले असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले असून त्यांचे विरुध्द शिराळा पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्री. सुरज गुरव सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक सुहास नाडगौडा सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे पोलीस उप अधीक्षक, पोलीस निरीक्षक श्री प्रशांत चौगुले, पोलीस अंमलदार धनंजय खाडे, प्रितम चौगुले, अजित पाटील, बाळासाहेब पवार, श्रीपती देशपांडे, संजय संकपाळ, राधीका माने, विना जाधव, यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with CamScanner